# कौटुंबिक हिंसाचार आणि मानवी अधिकार एक अभ्यास

**मठपती ऋषीकेश सुभाष**

## गोषवारा

जागतिक आरोग्य संघटनेनुसार महिलांवरील हिंसा ही सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या तसेच मानवी अधिकारांचे उल्लंघन आहे. 2023 च्या जागतिक अंदाजानुसार जगभरातील सुमारे एक-तृतीयांश महिलांनी आयुष्यात कधीतरी शारीरिक आणि/किंवा लैंगिक हिंसा अनुभवली आहे. भारतात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी *Protection of Women from Domestic Violence Act, 2005* हा महत्त्वाचा कायदा अस्तित्वात आहे. या कायद्याचा उद्देश कुटुंबात होणाऱ्या विविध प्रकारच्या हिंसेपासून महिलांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करणे हा आहे. कौटुंबिक हिंसाचार ही केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक समस्या नसून ती मानवी अधिकार, सामाजिक न्याय आणि लैंगिक समानतेशी संबंधित गंभीर सामाजिक समस्या आहे. कुटुंब ही व्यक्तीच्या सुरक्षिततेची आणि भावनिक विकासाची प्राथमिक संस्था मानली जाते; परंतु याच संस्थेत शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक आणि भावनिक हिंसाचार घडल्यास व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते. विशेषतः महिलांना जोडीदार, सासरचे कुटुंबीय किंवा इतर जवळच्या व्यक्तींकडून होणारी हिंसा त्यांच्या जीवन, स्वातंत्र्य, समानता, प्रतिष्ठा, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या अधिकारांवर परिणाम करते. या संशोधन पेपरमध्ये कौटुंबिक हिंसाचाराची संकल्पना, त्याचे प्रकार, कारणे, मानवी अधिकारांवरील परिणाम, भारतीय कायदेशीर तरतुदी, सामाजिक परिणाम, अंमलबजावणीतील अडचणी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**कीवर्ड्स -** कौटुंबिक हिंसाचार, मानवी अधिकार, महिला अधिकार, लैंगिक समानता, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण

## प्रस्तावना

"व्यक्तीच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असणारी बाह्य परिस्थिती म्हणजे अधिकार होय" ज्या अधिकारांमुळे व्यक्तीला स्थैर्य व स्वास्थ लाभते व आपल्या जीवन विकास साधता येतो अशा अधिकारांना मुलभूत मानवी अधिकार म्हणतात इ.सपूर्व 539 मध्ये प्राचीन इराणी साम्राज्याने घोषित केलेली 'सायरस वृत्तचिती हा मानवी अधिकाराविषयी पहिला लिखित दस्ताएवज मानण्यात येतो. या घोषणेने ईराणमधील गुलामीची प्रथा

संपुष्टात आणली. कलिगच्या युध्दानंतर सम्राट अशोकाने 'अशोकाचे आदेशपत्र जारी करून आपल्या ध्येय धोरणात मानवी हक्कांना प्राधान्य दिले तसेच महंमद पैगबरानी सन 622 मध्ये मानवी हक्कांचा उल्लेख असलेली 'पदिनेची सनद' तयार केली होती सन 1215 ला इंग्लडमध्ये 'मॅग्नाकार्टा स्विकृत झाला हा जगातील पहिला लिखित मानवी अधिकारपत्र होते. हे पत्र म्हणजे ब्रिटिश राजा आणि प्रजा याच्यातील करार होता सन 1628 ला 'अधिकार याचिका पत्र, 1679 ला 'बदीप्रत्यक्षीकरण कायदा, 1776 ची अमेरिकन स्वातंत्र्यांची घोषणा, 1789 मध्ये फ्रेंच राज्यक्रांती इत्यादी घटना घडामोडीमुळे मानवी अधिकाराला चालना मिळाली. 10 डिसेंबर 1948 रोजी सयुक्त राष्ट्र संघटना (युनो) या आंतरराष्ट्रीय संघटनेने मानवाधिकारांचे घोषणापत्र स्विकारले त्यानुसार अनेक नवस्वतंत्र देशात सविधानातच नागरिकांच्या मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला भारतात स्वातंत्र्यापूर्वीपासूनच संयुक्त राष्ट्र संघटनेचा सदस्य होता त्यामुळे राज्यघटना तयार करताना मानवी अधिकारांचा सखोल विचार झालेला आहे. मानवाधिकार घोषणापत्रातील अधिकांश अधिकार भारतीय राज्यघटनेतमुलभूत हक्क आणि राज्यांची मार्गदर्शक तत्व यांच्यात उल्लेख केला आहे भारतातील कुटुंब संस्था ही महिलाच्या गुलामगिरी व शोषणावर आधारीत आहे जगातील प्रत्येक समाजामध्ये कमी अधिक प्रमाणात स्त्रियांना कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडावे लागत आहे या अनुषगाने भारतीय सविधानाच्या अनुच्छेद 14,15 व 21 मध्ये मुलभूत हक्काची हमी देण्यात आली आहे कौटुंबिक हिसाचारा पासून महिलाचे सरक्षण करणारा कायदा 2005 मध्ये ससदेने समत केला. या कायद्याचे स्वरूप दिवाणी आहे. न्यायालयाच्या माध्यमातून महिलाना न्याय मिळवून देणे, महिलाचे कौटुबिक हिंसाचापासून संरक्षण करणे इत्यादीना आळा घालून महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा महात्त्वाचा उद्देश कायद्यात आहे. कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी भारतीय दड विधान अन्वये कौटुंबिक हिंसाचारापासून महिलाचे सरक्षण करणारा कायदा 2005 आणि 2006 मध्ये अमलात आणला जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण भारतात हा कायदा लागू आहे. ज्या अंतर्गत स्त्री आपल्यावरील अन्यायाविरुध्द थेट दाद मागू शकते. सर्वप्रथम अन्याय अत्याचार म्हणजे काय हे स्त्रीला माहित असणे अत्यंत आवश्यक आहे भारतात या कायद्याची अंमलबजावणी म्हणावी तशी झाली नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. कौटुंबिक हिंसाचाराची संकल्पना स्पष्ट करणे.
2. कौटुंबिक हिंसाचाराचे विविध प्रकार समजून घेणे.
3. कौटुंबिक हिंसाचार आणि मानवी अधिकार यांचा संबंध अभ्यासणे.

4. कौटुंबिक हिंसाचाराची सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक कारणे शोधणे.
5. महिलांच्या मूलभूत अधिकारांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
6. भारतातील कौटुंबिक हिंसाचारासंबंधी कायदेशीर संरक्षणाचा आढावा घेणे.
7. कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणींचे चिकित्सक परीक्षण करणे.
8. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती**

या अभ्यासासाठी **वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि चिकित्सक संशोधन पद्धतीचा** वापर करण्यात आला आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराची संकल्पना**

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कुटुंबातील किंवा जवळच्या नातेसंबंधातील व्यक्तीवर शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक किंवा भावनिक स्वरूपाची हिंसा अथवा नियंत्रण लादणे. भारतात *Protection of Women from Domestic Violence Act, 2005* हा या संदर्भातील महत्त्वाचा केंद्रीय कायदा आहे. कायद्याच्या उद्देशात कुटुंबात होणाऱ्या विविध प्रकारच्या हिंसेपासून महिलांच्या संविधानाने हमी दिलेल्या अधिकारांचे अधिक प्रभावी संरक्षण करण्याचा स्पष्ट उल्लेख आहे. हा कायदा 2005 मध्ये अधिनियमित झाला आणि 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू झाला. म्हणून भारतीय कायद्याच्या दृष्टिकोनातून कौटुंबिक हिंसाचाराकडे केवळ शारीरिक मारहाणीच्या स्वरूपात पाहिले जात नाही.

**कौटुंबिक हिंसाचार आणि मानवी अधिकार विश्लेषण**

**स्त्रियावरील होणारा कौटुंबिक अत्याचार**

मानसिक, शारिरीक, शाब्दीक, लैंगिक, आर्थिक छळ, इत्यादी कारणावरून स्त्रियावर अत्याचार केला जातो आपत्य नसल्यामुळे हिणवणे, धमकावणे, त्रास देणे, हुड्याची मागणी करणे, जीव धोक्यात आणणे, इत्यादीसामाजिक अपवृत्तीच्या घटनांचा परिणाम स्त्रियावर पडत असतो शारिरीक छळ करणे मारह मारहाण करणे, तोडात मारणे, तडाखा देणे, चालवणे, लाथ मारणे, गुद्दे मारणे, इत्यादी प्रकारचा शारिरीक छळ केला जातो.

**शारीरिक हिंसा**

शारीरिक इजा करणे, मारहाण करणे, ढकलणे, जाळण्याचा प्रयत्न करणे किंवा शरीराला दुखापत करणे यांचा शारीरिक हिंसेमध्ये समावेश होतो. याचा थेट परिणाम व्यक्तीच्या जीवन आणि शारीरिक सुरक्षिततेच्या अधिकारावर होतो.

**मानसिक व भावनिक हिंसा**

सतत अपमान करणे, धमकावणे, कमी लेखणे, भीती निर्माण करणे, सामाजिक संबंध तोडण्यास भाग पाडणे किंवा मानसिक दबाव निर्माण करणे यांचा मानसिक हिंसेत समावेश होतो. मानसिक हिंसेमुळे चिंता, नैराश्य, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलगाव निर्माण होऊ शकतो.

**लैगिक अत्याचार**

जबरदस्तीने समागम करणे, आश्लील फोटो काढणे, बिअत्स कृत्य जबरदस्तीने करायला लावणे, तुमची समाजातील किंमत होईल या दृष्टीने आश्लील चाळे करणे, किवा तुमची बदनामी करणे, किवा अनैसर्गिक आश्लील कृत्य करणे होय.

तोंडी **आणि भावनिक अत्याचार**

अपमाण करणे, वाईट नावाणे बोलवणे, चारित्र्य किया वागणुकी बदल संशय घेणे, मुलगा नाही म्हणून अपमान करणे, हुंड्यासाठी अपमान करणे, पाल्याला शिक्षणासाठी मज्जव करणे, नोकरीस मज्जाव करणे, घराबाहेर पडण्यास बधी घालणे, जबरदस्तीने विवाह करण्यास भाग पाडणे आत्महत्येची धमकी देणे.

**आर्थिक अत्याचार**

हुंड्याची मागणी करणे, मुलाच्या पालण पोषणासाठी आर्थिक सहाय्य करणे, मुलभूत गरजा न पुरवणे, रहात्या घरातून हाकलून देणे, घरातील वस्तू वापरण्यास रोखणे.

**व्यसनाधीनता**

दारू किंवा इतर पदार्थांचा हानिकारक वापर हा काही परिस्थितींमध्ये हिंसाचाराच्या जोखमीशी संबंधित असू शकतो; मात्र तो हिंसाचाराचे समर्थन करणारा कारण म्हणून पाहता कामा नये. WHO देखील harmful alcohol use ला संबंधित जोखीम घटकांमध्ये नमूद करते.

**सामाजिक रूढी**

"कौटुंबिक वाद घरातच सोडवावा" किंवा "पतीला पत्नीवर अधिकार आहे" अशा मानसिकता हिंसेला अप्रत्यक्ष सामाजिक मान्यता देऊ शकतात.

**हिंसेचे पिढ्यान्पिढ्या संक्रमण**

बालपणी कुटुंबात हिंसा पाहिलेल्या व्यक्तींमध्ये पुढील जीवनात हिंसक वर्तन किंवा हिंसा सहन करण्याचा धोका वाढू शकतो. WHO ने कुटुंबातील हिंसा पाहणे आणि बालपणीचा छळ यांना संबंधित जोखीम घटकांमध्ये नमूद केले आहे.

**आंतरराष्ट्रीय मानवी अधिकारांचा दृष्टिकोन**

कौटुंबिक हिंसाचार हा आंतरराष्ट्रीय मानवी अधिकारांच्या चौकटीतही गंभीर विषय आहे. महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी संयुक्त राष्ट्रांच्या विविध आंतरराष्ट्रीय साधनांनी आणि करारांनी राज्यांची जबाबदारी अधोरेखित केली आहे. UN Womenच्या मते महिलांना हिंसामुक्त जीवन जगण्याचा अधिकार आंतरराष्ट्रीय मानवी अधिकारांच्या चौकटीत संरक्षित आहे. महिलांवरील हिंसाचाराच्या निर्मूलनासाठी **Convention on the Elimination of All Forms of Discrimination against Women (CEDAW) आणि 1993 UN Declaration on the Elimination of Violence against Women** हे महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय संदर्भ आहेत. यावरून स्पष्ट होते की कौटुंबिक हिंसाचाराला केवळ वैयक्तिक कौटुंबिक प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे नाही; तो राज्य, समाज आणि न्यायव्यवस्थेच्या जबाबदारीशी संबंधित मानवी अधिकारांचा विषय आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराचा आरोग्यावर परिणाम**

WHO नुसार intimate partner violence मुळे शारीरिक दुखापती, नैराश्य, चिंता, मानसिक आघात, लैंगिक व प्रजनन आरोग्याच्या समस्या आणि इतर दीर्घकालीन आरोग्यविषयक परिणाम होऊ शकतात. गर्भावस्थेतील हिंसाचाराचा गर्भधारणा आणि बाळाच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराला आरोग्य क्षेत्राशी संबंधित समस्या म्हणूनही पाहणे आवश्यक आहे.

**मुलांवर होणारे परिणाम**

कौटुंबिक हिंसाचाराचा परिणाम केवळ हिंसा सहन करणाऱ्या व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. हिंसक वातावरणात वाढणाऱ्या मुलांच्या भावनिक आणि वर्तणुकीशी संबंधित विकासावरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

WHO च्या माहितीनुसार हिंसाचार असलेल्या कुटुंबात वाढणाऱ्या मुलांमध्ये भावनिक आणि वर्तणुकीशी संबंधित अडचणी निर्माण होऊ शकतात आणि पुढील आयुष्यात हिंसा अनुभवण्याचा किंवा करण्याचा धोका वाढू शकतो.

वरील प्रकारे स्त्रियावरील कौटुबिक वातावरणात वावरत असताना अत्याचार केला जातो या अत्याचाराने पिढीत स्त्री कायद्याच्या आधार घेऊन दाद मागू शकते. स्त्रीचे शोषण रोखण्यासाठी स्त्रियांना खालील प्रकारचे संरक्षण देण्यात आले आहे.

**कायद्याचे संरक्षण**

१. 5 व्या कलमा अन्वये संरक्षण अधिकारी आणि सेवा पुरविण्याऱ्याचे सहाय्य मिळू शकते
२. तुम्हाला आणि तुमच्या मुलाना कौटुंबिक हिंसाचारापासून कलम 18 अन्यये संरक्षण मिळू शकेल
३. स्त्रीचं दागदागिने, दरोजच्या वापरातील वस्तू कलम 18 अन्वये पुन्हा मिळू शकतील
४. शकतील वैद्यकीय सेवा, कायद्या संबंधीची मदत कलम 6.7.9 आणि 14 अन्वये मिळू

समारोप :

संयुक्त राष्ट्र संघटनेने 10 डिसेंबर हा दिवस जागतिक मानवी हक्क दिवस म्हणून जगभर पाळण्यात येतो भास्तात लोकमान्य टिळकांच्या स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच या गगनभेदी घोषणेतच जन्मसिध्द हक्क म्हणजेच नैसर्गिक हक्कांचा समावेश आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी भारतातील दलित व स्त्रिवर्गाला जात, धर्म, लिग यामुळे नाकारले गेलेले हक्क मिळावेत म्हणून सर्वतोपरी प्रयत्न केले त्यानुसार भारताच्या राज्यघटनेतील तिसऱ्या भागात नागरिकांच्या मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला आहे.

कौटुंबिक हिंसाचार हा मानवी प्रतिष्ठेला आणि मूलभूत अधिकारांना आव्हान देणारा गंभीर सामाजिक प्रश्न आहे. कुटुंब ही सुरक्षिततेची संस्था असली पाहिजे; परंतु जेव्हा त्याच ठिकाणी हिंसा, भीती, नियंत्रण आणि भेदभाव निर्माण होतो, तेव्हा व्यक्तीच्या मूलभूत मानवी अधिकारांचे उल्लंघन होते.

जागतिक पातळीवरील पुरावे दर्शवितात की महिलांवरील हिंसा ही मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेली मानवी अधिकार आणि सार्वजनिक आरोग्याची समस्या आहे. WHO च्या 2023 च्या अंदाजानुसार जवळपास तीनपैकी एक महिला आयुष्यात शारीरिक आणि/किंवा लैंगिक हिंसेचा अनुभव घेते.

भारतात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी 2005 चा कायदा महत्त्वपूर्ण पाऊल आहे. तथापि, कायदा आणि प्रत्यक्ष सामाजिक वास्तव यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी प्रभावी

अंमलबजावणी, जनजागृती, आर्थिक सक्षमीकरण, सुरक्षित निवास, समुपदेशन आणि न्यायव्यवस्थेपर्यंत सुलभ प्रवेश आवश्यक आहे.

कौटुंबिक हिंसाचार निर्मूलनासाठी केवळ हिंसा झाल्यानंतरची कायदेशीर कारवाई पुरेशी नाही. **हिंसेची कारणे निर्माण करणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक असमानतेत परिवर्तन करणे** आवश्यक आहे. समानता, प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, परस्पर आदर आणि अहिंसक कौटुंबिक संबंध यांवर आधारित समाजरचना निर्माण करणे हीच या समस्येवरील दीर्घकालीन उपाययोजना ठरू शकते.

**संदर्भ सूची**

१. भारत सरकार. *The Protection of Women from Domestic Violence Act, 2005*. India Code.

२. Ministry of Law and Justice, Government of India. *Protection of Women from Domestic Violence Act, 2005*. National Portal of India.

३. Women and Child Development Department, Government of Maharashtra. *Important Acts*.

४. महिला व बालविकास आयुक्तालय कौटुंबिक हिंसाचारापासून महिलाचे सरक्षण कायदा 2005

५. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि नियम